आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०१९-२० करीता प्राप्त तरतूदींचे वितरण लेखाशिर्ष (२२२५ २२८२)

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१९/ प्र.क्र.०३/कार्यासन-६.

पहिला मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २० सप्टेंबर,२०१९.

वाचा:-

१) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९ /प्र.क्र.४४/ अर्थ-३, दि.१.०४.२०१९.**
२) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९ /प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि.८.०७.२०१९.**
३) **जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, मंजूरी आदेश क्र. F.No.२००१४/१९/२०१८-Sch, दि.१२.०६.२०१९, दि.२३.०७.२०१९ व दि.६.०८.२०१९.**
४) **आदिवासी विकास विभाग,नस्ती क्र.भासशि-२०१८/ प्र.क्र.११७/का-१२.**

शासन निर्णय:-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता मागणी क्र. टी-५, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजना (०२) (०९) भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (२२२५ २२८२), ३४- शिष्यवृत्ती व विद्यावेतने या योजनेकरीता एकूण रु.२५०००.०० लक्ष तरतूद अर्थसंकल्पित आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ येथील परिपत्रकानुसार या अर्थसंकल्पित तरतूदीपैकी ६० टक्के मर्यादेत निधी वितरणासाठी उपलब्ध आहे.

२. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्र.३ येथे नमूद आदेशांद्वारे भारत सरकार मॅट्रिकोत्त्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र हिश्श्याचा एकूण रू.१०७७५.३८ लाख इतका निधी राज्यास वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याबाबत वित्त विभागाने प्रमाणित केले आहे. संदर्भाधीन क्र.४ येथील प्रस्तावास अनुसरून (०२) (०९) भारत सरकार मॅट्रिकोत्त्तर शिष्यवृत्ती (लेखाशिर्ष २२२५ २२८२), ३४- शिष्यवृत्त्या व विद्यावेतने याखाली रु.१०७७५.३८ लाख (अक्षरी रुपये एकशे सात कोटी पंच्याहत्तर लाख अडतीस हजार फक्त) इतकी तरतूद नियंत्रक अधिकारी तथा आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर निधी अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी महा-डीबीटी प्रणालीमार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्याकरीता वितरीत करण्यात येत आहे.

४. वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करतांना नियंत्रक अधिकारी यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यांमधील वित्तीय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ व २ येथील परिपत्रकान्वये विहित केलेल्या नियमांचे पालन करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१९/ दि.६.०९.२०१९ अन्वये दर्शविलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१८१३४२१९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a91296205b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2019.09.20 18:37:57 +05'30'

किरण कि.पवार
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/नागपूर/अमरावती.
३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (सर्व).
४. महालेखापाल (लेखापरिक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र राज्य विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. वित्त विभाग (अर्थसंकल्प-१९/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
९. कार्यासन अधिकारी/ अवर सचिव (का-०२/ का-१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.